Rotary | SERVE TO CHANGE LIVES

Year: 52 Vol: 07 January 2022

# southern star ...अवघे धरू सुपंथ

**Official Bulletin Of The Rotary Club Of Pune South**

## *Celebrating Vocational Service Month*



President:
Rtn. Atul Atre

Secretary:
Rtn. Krishnakiran Velankar

Editor:
Rtn. Abhijit Deshpande






# नवे वर्ष

## रो. श्वेता करंदीकर

नवे वर्ष अन् नवीन आशा
नव्या जाणिवा नवीन दिशा
नव चैतन्य अन् नव आचार
नवे तेज अन् नवीन करार

नव्या कल्पना नवीन दृष्टी
नवा साज ल्यालेली सृष्टी
आस मनाला नाविन्याची
आणिक नूतन सृजनतेची

नव विचारांचा पांघरून शेला
आला नूतन दिवस आला
नव विचारांचे स्वागत करूया
नाविन्याला अंगी रुजवूया

झाले गेले सरून गेले
सारेच ते आता विसरुया
नव्या क्षणा आपले म्हणुया
नव आव्हाना सामोरे जाऊया




## महाराष्ट्राची गिरीशिखरे पुरस्कार

दि. २६ डिसेंबर २०२१ रोजी मुंबई येथील रंगशारदा सभागृहात महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या हिरक महोत्सवानिमित्त पीपल्स आर्ट सेंटर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिना “महाराष्ट्राची गिरिशिखरे” हा पुरस्कार देण्यात आला. कर कायद्या संबंधी छोटे मध्यम व्यापारी याच्या समस्या सोडविणे आणि सामान्य कर दात्याला समजेल अश्या भाषेत मराठीतून कर कायद्या बद्दल प्रबोधन केल्याची नोंद घेत पुण्यातील कर सल्लागार आपले ज्येष्ठ सदस्य पीपी रो. गोविंद पटवर्धन यांना महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी याच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

गोविंदरावांचे यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

- रो. दत्ता पाषाणकर






## पुस्तक भेट

पीपी रो. शामराव कुलकर्णी यांनी आपल्या क्लबच्यावतीने न्यू इंग्लिश स्कूल वाई येथे शालेय उपयोगी 51 पुस्त्त्कांचा संच दिला. ही सर्व पुस्तके रो.योगेंद्र नातू ह्यांनि दिलेली होती.

शामराव व योगेंद्र नातू यांचे आभार !






## Congratulations Rtn. Mridula Ghodke






## VOCATIONAL SERVICE

Vocational Service is the "Second Avenue of Service." No aspect of Rotary is more closely related to each member than a personal commitment to represent one's vocation or occupation to fellow Rotarians and to exemplify the characteristics of high ethical standards and the dignity of work. Programs of vocational service are those, which seek to improve business relations while improving the quality of trades, industry, commerce and the professions. Rotarians understand that each person makes a valuable contribution to a better society through daily activities in a business or profession. Vocational service is frequently demonstrated by offering young people career guidance, occupational information and assistance in making vocational choices. Some clubs sponsor high school career conferences. Many recognize the dignity of employment by honoring exemplary service of individuals working in their communities. The 4-Way Test and other ethical and laudable business philosophies are often promoted among young people entering the world of work. Vocational talks and discussion of business issues are also typical vocational service programs at most clubs. Regardless of the ways that vocational service is expressed, it is the banner by which Rotarians "recognize the worthiness of all useful occupations" and demonstrate a commitment to "high ethical standards in all businesses and professions." That's why the Second Avenue of Service is fundamental to every Rotary club.






# How Data Science Can Transform India

Dr. Prashant Pansare

For the past few years, several industries have leveraged the power of data science in marketing, risk management, fraud detection, business operations, supply chain, business model innovations, and many other such areas. By using statistics, predictive Modeling, and machine learning, data science helps enterprises resolve various challenges within the industrial sectors and for the economy at large.

When implemented correctly, data science is a powerful tool and brings positive results. We already witnessed massive changes in how the western countries and industries work and how data science is empowering that change. But when it comes to India, we are still lagging behind the western counterparts. Dr. Avik, Head, Data Analytics, Niti Ayog, stated that "We are trying to make sense of the operational data to get a good picture of the state of the economy." He also shared his challenges over the collection and implementation of data, as most of the collected data is highly unstructured and difficult to make any sense.

Data science, as we understand, is the study of information such as where it comes from, what it represents, and how to transform it into a valuable resource in the creation of business and economic strategies. It also includes mining of extensive structured and unstructured data.

It identifies the patterns which can help businesses or government bodies to minimize costs, increase efficiency, recognize new opportunities, and take other development advantages.

While the data collection is vital, it is only the first step in the process. The ultimate use of data is to derive meaningful and actionable insights.

## How data science can transform India

For centuries, data has been the backbone of all the research. Now with the proliferation of advanced technologies, programming languages, and availability of high computing power, its use has spread to countless businesses as well as for formulating better government policies.

Let's take a look at various ways data science can transform India -

## Conserving Water

According to the Niti Ayog water index report, 21 cities of India including four major cities namely Delhi, Hyderabad, Bengaluru, and Chennai, will run out of groundwater by 2020. Every summer, we see drought, and the situation is worse in rural areas. The water usage is also increasing, and less rainfall could end up turning it into a severe crisis very soon. The Indian government can use data science to predict water level and the water usage patterns in certain areas. The government can also organize water supply tanks in time after making an informed decision with the help of collected data. Armed with more information and data, it can become easier for the government bodies to come up with more ideas for rainwater harvesting and to increase the groundwater level.

## Controlling Air Pollution

As per the World Health Organization report, 11 out of the 12 most polluted cities are in India. India ranked 141 out of 180 nations in the environmental performance index. This shows that the problem is grave, and the authorities need a permeant solution to control air pollution as soon as possible. With the help of data science, the government can take preventive measures to control different variables like pollution from vehicles, crop burning, industry fuel, and biomass burning.

## Generating Electricity

Did you know? India is the third largest producer and consumer of electricity? India's gross electricity consumption during the 2017-18 was 1,149 kWh per capita. The demand for power is soaring every year. The Government of India has also launched the "Power for All" program to provide adequate electricity supply to all the people in the country. Data science can help authorities to understand the consumption pattern of the households classified by states, districts, cities, regions, streets. After interpreting the demand and the pattern of consumption, the authorities can predict the usage of electricity and take appropriate measurements to organize for the required electricity demands and optimize the usage.

## Improved Healthcare

The Indian healthcare system offers a unique approach to leverage data science to conduct research, clinical trials, and medical data to plan public policies. The healthcare system providers generate data through various resources, including the biometric, patient's record, medicines, prescriptions, and many others. When stored centrally and analyzed in real-time, this data can provide actionable insights, predict outcomes, and help in better planning of treatment protocols for improved public health.

## Enhanced National Security

The security situation in India is unpredictable. The general security officers face a lot of challenges to understand how the information is analyzed, collected, and implemented to protect the country against unforeseen situations. They can use data science to collect information and identify the gray areas associated with security. The police and security agencies can collect and analyze the data and tackle crimes, attacks, and other dangerous circumstances in the country.

## Traffic Jam Solutions

Long traffic jams are frequent in India. The Niti Aayog team is working to understand the causes of traffic jam and options to deal with them. The government bodies can use big data to analyze some of the significant aspects of traffic jam like choke points, narrow or broken roads, lack of traffic management professionals, failure of traffic lights, and other such elements.

The traffic policemen can use CCTV cameras and sensors to monitor traffic and immediately solve the problem. Road accidents kill more than 400 people every day. The figure is disappointing, and the traffic authorities can use data science to analyze the pattern and take immediate action to prevent accidents.

## Build a Better Nation

Data is an essential asset and backbone for the smooth functioning of various government bodies. Government agencies collect a significant amount of data from surveys, programs, public banks, and administration. The roadmap to build an analytical framework to integrate data in public departments is quite promising and will transform the entire nation digitally. The government needs a strategy which merges industries to build successful data and analytical capabilities. This would offer a wide range of social benefits to the citizens and improve their lives considerably.

---


## Dr. Prashant Pansare
## Founder & CEO - Inteliment Group & Rubiscape Pvt Ltd


D. Litt, Honorary (Honoris Causa) in Data Science & AI, from George Washington University, USA. A triple MBA and a Mechanical Engineer by qualification, Prashant is also pursuing Ph.D. in Innovation Incubation and Management.

Prashant is an innovator at heart and an entrepreneur by profession. With a passion for innovation, product incubation and digital transformation, he bootstrapped Inteliment in 2004 and Rubiscape in 2020. Prashant's strengths are in identifying and investing in next-generation technologies and fostering innovation culture.

Prashant has been the driving force in growing Inteliment since its inception as a globally respected Bigdata Analytics Company operating in Australia, Singapore, and Europe partnering with 100's of fortune companies.

He founded Rubiscape in 2020, India's first unified Data Science Product Company, emerged as a winner of 11th Aegis Graham Bell Award for Innovation, MCCIA's GS Parkhe Award in 2020. Rubiscape has also launched – RubiVersity - an Ed-tech product for future skilling in AI-ML, Data Science partnering with leading universities for Digital Education and has been recognised as a winner as Innovative Ed-Tech 2021 by The Entrepreneur Magazine.

Recognized as 'CEO of a Fast-Growing Company' by Deloitte, Prashant has been part of NITI Aayog's various initiatives and think-tank. He is a part of Maharashtra's Chief Minister's Digital Transformation Council and is on NASSCOM's National Product Council, a Mentor for Atal Mission 2020 Program. A former Chairman of the Indo-American Chambers, he was also invited on the Global Partner Analytics Advisory Council by SAP Labs, USA.

Inteliment has won several international awards and accolades - Deloitte's India Technology Fast 50 and Asia Fast 500, Business Excellence Award by CII & EXIM Bank, Analytics Innovation Partner by SAP, Govt of Maharashtra's SME Innovation Award, WorldCob USA's The Bizz Award, Zee & Time Award for Innovation.

As an investor, advisor, and mentor, he has helped several start-ups and researchers. He has served numerous positions at various Chambers of Commerce and Industry Associations and has made significant contributions and high socio-economic impact through CSR projects.






# माकड मन

## ॲन मोहिनी नातू

धनंजय जोशी लिखित 'सहज' या पुस्तकातील एक लेख...शीर्षक आहे "माकड मन”

ध्यानात मग्न असताना अचानक "घंटी"चा आवाज आला...दुपारच्या जेवणासाठी...!

ध्यानाच्या त्या अवस्थेमधून मी आपोआप उठलो आणि जेवणाची तयारी करू लागलो.. माझं मन म्हणालं..,"काय विचित्र आहेस तू..! साक्षात्काराच्या जवळ होतास,पण जेवणासाठी उठलास लगेच.!!

मन कसं असतं, हे समजायला हवं..! अगदी माकडासारखं..!

माझ्या एका शिबिरातली आठवण--

शिबिरामध्ये वेळेचं ध्यान ठेवलं जातं... प्रत्येक जण मौन पाळत असल्यामुळे वेगवेगळ्या प्रसंगांसाठी . (उदाहरणार्थ...नाश्ता, दुपारचे जेवण, चहा वगैरे) एक घंटा वाजवली जाते... मग त्या-त्या वेळेप्रमाणे आपण वागायचं...!!

म्हणजे नाश्त्याची घंटा वाजली की, आपण त्या हॉलमध्ये जायचं आणि न बोलता नाश्ता करून परत आपली साधना सुरू करायची...!!

असं किती दिवस...??

-तीन,सात ,दहा ,नव्वद, एकशे आठ.. दहा हजार..!!

अशा एकाकी शिबिरात तुम्हाला एक स्वतंत्र खोली असते,किंवा एखादी झोपडी पण असते..(झेन शिबिरामध्ये...)

माझ्या एका शिबिरामध्ये(दिवसातून वीस-बावीस तास ध्यान करताना).. खूप साक्षात्कारांशी जवळीक झाली...

अत्यंत आनंदी स्थिती अनुभवली... त्या स्थितीमध्ये रम्य असताना "घंटी"चा आवाज आला...

किती वाजता..??

तर- दुपारच्या जेवणासाठी...!!

मग झालं काय..?? मी ध्यानाच्या अवस्थेमधून आपोआप उठलो आणि जेवणाची तयारी करू लागलो....

जेवणाच्या हॉल मध्ये जाताना माझं मन म्हणालं.... "किती विचित्र आहेस तू..!! "साक्षात्कारा"च्या जवळ होतास तू अगदी... पण जेवणासाठी उठलास लगेच...!! काय वाटतं तुला..??

-मनाची गंमत..!!

मला दुसरी एक जपानी गोष्ट आठवते..

जपान मध्ये एका माणसानं आपल्या दोन माकडांना नाटकामध्ये कसा अभिनय करायचा ते शिकवलं होतं ...अगदी राजा-राणी सारखं सुंदर नाटक/प्रवेश बसवला होता...

प्रवेश सुरू झाला...

acting तर अत्यंत सुंदर ..माकडं असूनही..!

...पण कुणीतरी अचानक एक खेळ स्टेजवर टाकलं..!!

मग पुढे त्या नाटकाचं काय झालं असेल,हे सांगायला नकोच.

--आपलं मनही तसंच..!!

आला विचार की गेलो आपण त्याच्या मागे..!!

आपण असा विचार करत नाही किंवा अधिक महत्त्वाचं म्हणजे आपण"बघत" नाही की हा विचार फक्त "अ-कायम" आहे.. मग कशाला त्याच्या मागे लागायचं..??

त्या डांबराच्या गोळीला हात लावून कशाला आपलीच बोटं काळी करून घ्यायची??..

नाही का...?

आता इतकच .

Play Audio



# एका देशाची खोज़: भाग-१

## रो. डॉ. सुभाष देशपांडे

पं.जवाहरलाल नेहरूंनी अहमदनगर तुरूंगातल्या पाच महिन्यांच्या कालावधीत लिहिलेले पुस्तक डिस्कव्हरी ऑफ ईंडिया हेआहे.त्यावेळेस एकंदर परिस्थिती कशी होती हे प्रथम पाहूयात .

तुरूंगात त्यांच्या बरोबर अकरा कैदी होते.देशाच्या विभिन्न भागातून, निरनिराळया भाषीक प्रदेशातील, विभिन्न राजकीय विचारांचे, निरनिराळया विषयांवरील विद्वान तेथे एकत्र होते.मौलाना आझाद, गोविंद वल्लभ पंत ,नरेंद्र देव,असफ अली,वगैरे मंडळींनी पं.नेहरूंना अनेक प्रकारे पुस्तक लिहिण्यास मदत केली.1944 सालांत एप्रिल ते डिसेंबर ह्या काळात हे पुस्तक लिहिले गेले.

पं.नेहरूंचा जन्म 1889साली अलाहाबाद येथे झाले.पंधराव्या वर्षी ते इंग्लंड ला गेले.तिथे हॅरो व केंब्रिज येथे शिक्षण घेऊन 1912 साली हिंदुस्थानात परतले.ईतकी वर्षे पाश्चिमात्य देश आणि संस्कृती मध्ये राहिल्या मुळे स्वत:च्या देशाविषयी आणी देशवासीयाविषयी त्यांना दुरावा होता.

पहिल्या महायुद्धाच्या शेवटास 1918 सालांत त्यांच्यावर म.गांधींच्या विचारसरणीचा प्रभाव पडला आणि त्यांचा देश व देशवासीयांबद्दलचा दृष्टीकोन बदलला.त्यांना हिंदुस्थानविषयी ओढ वाटू लागली व देश आणि देशवासियांविषयी अधीक माहीती जाणून घेण्याची प्रबळ ईच्छा प्राप्त झाली.

जरी पं.नेहरु डाव्या विचारसरणीचे होते तरी त्यांनी कम्युनिस्ट विचारधारा स्वीकारली नाही. त्याना देशाच्या धार्मिक आणि वैचारिक विविधतेची जाणीव होती.इंग्रजांचे असे मत होते कि या धार्मिक ,सांस्कृतिक आणि वैचारिक विविधतेमुळे हिन्दूस्तान हा संलग्न देशच नव्हता.इंग्रज आल्यावर हिन्दूस्तान संलग्न देश झाला.

एकेकाळी हिन्दूस्तान कींवा सिंधूस्तान,अफगाणिस्तान ते म्यानमार आणी हिमालय ते कन्याकुमारीपर्यंत पसरलेला देश होता .हिन्दूस्तान ची ताकद त्याच्या विविधतेत आहे,हे एकच देश,एकच धर्म,एकच जात असलेल्या ईंग्रजांना समजलेच नाही.हे सर्व जगाला समजले जावे म्हणून कदाचित हिन्दूस्तान चा ईतिहास लिहिण्याची इच्छा पं.नेहरुना झाली असावी .

हिन्दूस्तान एक स्वत:ची,स्वतंत्र ओळख असलेला वैशिष्टय़पूर्ण देश आहे.जात,धर्म, भाषा आणि सामाजिक वैविध्यता असणाऱ्या देशाची एकत्रीतता खरोखरच वाखाणण्या जोगी आहे,जरी भारतीय राजकारण्यांनी, स्वातंत्र्य मिळवण्याच्या हव्यासापोटी,धार्मिक तत्त्वावर देशाची फाळणी करण्यास परवानगी दिली, तरी सुध्दा.

त्याप्रमाणेच अहिंसेचा मेरू म.गांधींनी दुसऱ्या महायुद्धात जर्मनी,इटली विरूद्ध इंग्रजांना पाठिंबा दिला वसैन्य दल वापरास अनुमती दिली,कारण गांधी नेहरू वंशवाद कींवा एकतंत्रवादाच्या विरुद्ध होते.नेहरुनीहिटलरवमुसोलीनीनेभेटण्याकरीता दिलेली आमंत्रणे नाकारली होती,ह्यापाठीमागे हिंसेला पाठींबा देणेअथवा ईंग्रजाचे लांगून चालन करणे असा हेतुनसून,वास्तवाशी समझोता करण्याची मुत्सद्देगिरी होती.

अहमदनगर तुरूंगात पं.नेहरू चौतीस महीने होते.त्यांतील पाच महीन्यात त्यांनी डिस्कव्हरी ऑफ ईंडिया हे पुस्तक लिहले.1946,सालीते प्रथम प्रकाशित झाले.अहमदनगर तुरूगातील पहिले तीन दिवस कैद्यांना एकांतवासात ठेवले होते.चन्द्राच्या कलांवर दिवस ठरत होता.भारतीय पंचांग चंद्र कलांवर अवलंबुन आहे,कारण चंद्र सहज बघता येतो व त्याच्या कलासहज मोजता येतात.त्यानंतर कैद्यांना सेन्सॉर केलेली वर्तमान पत्रे दिली जात असत.त्यामधून जगात चाललेला महायुद्धाचा हिंसाचार आणी भारतावर मार्शल लॉ खाली केलेले अत्याचार वगळलेले असत.

त्याच सुमारास बंगाल वगैरे प्रदेशात भीषण दुष्काळ पडला होता.भुकेने हजारो माणसं, स्त्रिया,मुले,मृत्युमुखी पावली. सर्व जग दुसऱ्या महायुद्धात गुंतले असल्याने हिन्दूस्तानला कुणीही मदत केली नाही.हा दुष्काळ सरकारी संवेदनशून्यता,बेपर्वाई, दुसरे महायुद्ध व देशांतर्गत अक्षमता या मुळे घडला.काहींनी वैयक्तिक रीत्या मदत करण्याचा प्रयत्न केला,ज्या मध्ये चीन राष्ट्र सुध्धा होते.

बंदिवासाच्या एकाकीपणात भूतकाळ आपल्या बरोबर असतो.वर्तमान काळाचा पत्ताच नसतो.भविष्यकाळा विषयी अनिश्चितता असते.कालचेच नव्हे तर थोड्याचवेळापुर्वीचे सुद्धा भूतकाळात जमा होते.आजचे किंव्वा आत्ताचे वर्तमान काळात. या दोघांमध्ये वस्तर्याच्या धारे एव्हढेच अंतर असते.भूतकाळाचा वर्तमान आणी भविष्यकाळावर परिणाम होत असतो.भूतकाळात रमून चालत नाही.तो स्थिर असतो.स्तब्ध असतो.पं.नेहरूंना स्तब्ध राहण्यात स्वारस्य नव्हते.त्यांना सतत कृती करण्याची इच्छा असे. तुरूंगात कृती करणे शक्य नसल्यास ,जेंव्हा कृती करण्याची संधी मिळेल,तेव्हा,त्या संधीचा फायदा घेण्याकरिता, पं.नेहरू मनातल्यामनात तयारी करीत असत.भूतकाळातील अनुभवातून वर्तमानकाळातील कृतीला चालना मिळते,व त्या कृतीद्वारे होणारे परिणाम भविष्यकाळाकडे वाहतात .वर्तमान काळाचे मूळ भूतकाळात असते.अस्थिर वर्तमान काळ काही कालानंतर स्थिर भूतकाळ बनतो.अशा ह्या भूतकाळाचे पं.नेहरूंना आकर्षण होते,कारण वर्तमानकाळात भूतकाळापासून खूप शिकण्यासारखे असते.वर्तमान काळात भूतकाळाचा पुन:प्रत्यय येत असतो(History repeats itself).वर्तमान काळात कृती करण्याची प्रबळ ईच्छा आणी भावना असावी लागते,नाहीतर एखादा निरुत्साही व निराश होतो.

पं.नेहरू अहमदनगर तुरूंगात जाण्याच्या सुमारास, मनाने,विचारांने आणी स्वभावाने बरेच स्थिर व समजूतदार झाले होते. त्यांची मानसिक चलबिचल कमी झाली होती.कदाचित हा वाढत्या वयाचा परिणाम असेल किंवा तुरुंगातील, मंद गतीने ओहोटी लागल्यासारख्या जीवन शैलीत वावरताना,मनातील विचार संपून, त्याचे फ़क्त तरंग पाठीमागे राहील्यामुळे सुध्धा, असु शकेल .पं.नेहरूंना शाश्वत जगाची ओढ होती.धर्माकडे बघण्याचा त्यांचा द्रूष्टीकोन आध्यात्मिक नसून शास्त्रीय होता.परन्तु जे समोर दिसते त्याच्याही पलिकडे अनाकलनीय आणी अद्रूष्य दूनीया असु शकेल ,हे ते मान्य करत असत.धर्मात अनेक दोष असले तरी मानवांच्या अंतःकरणातील तहान धार्मिकतेने भागवता येते हे त्यांना मान्य होते.शास्त्रीय मार्गाने सर्व प्रश्नांची उत्तरे मिळत नसली तरी नजिकच्या काळात ह्या अनाकलनीय जगातील गुपितं शास्त्रीय मार्गाने सुटू शकतील असा त्यांचा विश्वास होता.अधूनीक मानव जरी बहीस्थ दूनीयेत गुंतला असला तरी संकटाच्या काळात तो अंतःकरण आणि आध्यात्माचा आधार घेतो हे त्यांना मान्य होते.त्यांचा अद्वैत वेदांत वादावर विश्वास होता.भक्तिमार्ग, आध्यात्म, चैतन्य वाद ,गूढमार्ग,यांपेक्षा तर्कशास्त्रावर पं.नेहरू भर देत असत .ते डाव्या विचारधारेचे होते.त्यांना सोव्हिएत रशियाच्या प्रगतीचे कौतूक होते,आणि त्या करीता व्यक्तिस्वातंत्र्याला थोडीशी मुरड घातली गेली, तरी त्यांचा त्यास विरोध नव्हता. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सर्व जगावर निराशेची छाया दाटली होती.परन्तु पं.नेहरूंना मानवांच्या मनोबलावर व त्याच्या चांगल्या हेतूवर विश्वास होता.स्वतःच्या तत्त्वांकरीता त्याग करण्याच्या वृत्तीवर विश्वास होता.जगभर पडलेल्या अंधःकारातून मानव सुखरुप बाहेर पडेल हा आत्मविश्वास त्यांना होता.

पं.नेहरू प्रथमतःलिखाण करण्यास कचरत होते.तुरूंगाबाहेरील जगात ईतकी उलथापालथ चालली होती की,तुरुंगातून सुटेपर्यंत सारे जग बदलले असेल व स्वतःचे लेख कालबाह्य ठरतील अशी भिती त्यांना वाटत असे.

अहमदनगर तुरूंगात त्यांचा वर्तमानकाळाशी संकर्प नव्हता,त्यामुळे वर्तमानकाळाविषयी लिहिण्यात अर्थ नव्हता. एखाद्या द्रूष्ट्यासारखी भविष्यकाळावर लिहिण्याची त्यांची तयारी नव्हती,कारण बाहेरील अनिश्चितेमुळे आज केलेले भाकीत उद्या खोटे ठरू शकेल अशी त्यांच्या मनात भिती होती.

कमला ,पं.नेहरूंची प्रिय पत्नी,त्यांच्या आयुष्यातील महत्वाची व्यक्ती होती .परन्तू पं.नेहरू कमलेला कीती उचीत वागणूक देऊ शकले याबद्दल शंकाच आहे.कमलेचे शिक्षण फारसं झाले नव्हते.त्याचप्रमाणे ती नेहरू घराण्यासारखी सुसंस्कृत घरांतून आलेली मुलगी नव्हती.ती एक साधीसुधी कश्मीरी बालिका होती.स्वातंत्र्य लढा त्या दोघांच्या संसाराआड आला.बहुतेक वेळेस पुरूष नेते तुरूंगात असत.अशावेळेस स्रीयांनी स्वातंत्र्य लढा पुढे चालू ठेवला .कमला सुद्धा त्या लढ्यात अग्रेसर होती.भारतीय स्त्रियांच्या स्वातंत्र्य लढ्यातील ह्या योगदानाबद्दल त्यांचे कौतुक सुद्धा झाले,परन्तू त्यांना खुप  त्याग सहन करावा लागला.कमला पण त्याला अपवाद नव्हती.28फेब्रूवारी 1936 साली कमला,लूसान-स्विसझर्लंड येथे मृत्यू पावली.त्याआधी पं.नेहरू इंडियन कॉंग्रेस पार्टीचे अध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा निवडून आले होते.जरी कमलेचे जाणे हे पं.नेहरूंचे न भरुन होणारे नुकसान होते,तरीते आता स्वातंत्र्य  देवीची सेवा करण्यास बंधमुक्त झाले होते.

उद्विग्न अवस्थेत असलेलेपं.नेहरू,इंदिरा बरोबर काही दिवस स्वित्झर्लंडला राहीले.इटलीचा हुकूमशहा मूसोलीनीला पं.नेहरूंची भेट घ्यावयाची होती.अर्थातच मुसोलीनीला ती भेट स्वतःच्या फायद्याकरता घ्यावयाची होती.पं.नेहरूंनी ह्या भेटीला नकार दिला होता,परन्तू परतीच्या प्रवासात त्यांचे विमान रोमला थांबणार होते,व मुसोलीनीची भेट टाळता येणार नव्हती.रोमला पं.नेहरूंना भेटण्यास इटलीचा एक वरिष्ठ आधीकारी आला होता.बरीच चर्चा झाल्यानंतर मुसोलीनीला पं.नेहरूंचा खेदपूर्वक नकार कळविण्यात आला.पं.नेहरूंनी अलाहाबादला पोचल्यावर  कमलेच्या अस्थि गंगेत विसर्जित केल्या.





# जीवनध्येय समजलेला आणि ते समरसून जगणारा हाडाचा कलाकार-चंद्रमोहन कुलकर्णी

रो. तृप्ती कुलकर्णी

काही प्रश्नांची उत्तरं सहज आणि नेमकी सापडणं अवघड असतं. विशेषतः काही महत्त्वपूर्ण घटना सहजगत्या जुळून आलेल्या असतात तेव्हा... अपेक्षित घटना घडणं हे अशक्य कोटीतलं नसलं तरी त्या इतक्या सहजसाध्य होतील अशाही नसतात.

'पुस्तकांना चेहरा देणारा माणूस' या कार्यक्रमाच्या निमित्तानं प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी सरांशी अनौपचारिक गप्पा मारण्याचा जुळून आलेला भन्नाट योग हाही असाच विशेष. प्रबळ इच्छा होती तरीही हा योग असा इतक्या सहज जुळून येईल असं वाटलं नव्हतं.

मुखपृष्ठकार म्हटलं की चंद्रमोहन सरांचं नाव माहीतच नाही असा माणूस पुस्तकांच्या क्षेत्रात मिळणं अवघड आहे. "हा असा कलाकार आहे... ज्यानं केलेल्या मुखपृष्ठांची संख्या पाहता अशा पुस्तकांचं एक स्वतंत्र ग्रंथालय होईल आणि त्यानं काढलेल्या चित्रांची संख्या पाहता त्यांचंही एक संग्रहालय होईल..." या दोन ओळीच सरांच्या कार्याची ओळख करून द्यायची तर पुरेशा आहेत. कार्यक्रमासाठी म्हणून मी सहज सरांचा बायोडेटा पाहिला तर केवळ चित्रकला या विषयात किती प्रकारे काम करता येऊ शकतं याची आपण कल्पनाच करू शकत नाही इतकं काम सरांनी केलं आहे.

गप्पांतून उलगडत गेलेले चंद्रमोहन सरांचे विचार खूपच प्रभावशाली वाटले. चित्र काढणं म्हणजे जे दिसतं ते काढणं असा समज आत्तापर्यंत होता. शाळांमध्ये अगदी कलामहाविद्यालयांतसुद्धा असंच शिकवलं जातं पण 'चित्रकला ही आतून बाहेर येणारी अभिव्यक्ती आहे.' हा त्यांचा विचार मला फार महत्त्वाचा वाटला. मग लक्षात आलं की, त्यांची चित्रं असोत वा मुखपृष्ठं असोत... या सगळ्यांत मानवी मनाचा; त्यातही अंतर्मनातल्या घडामोडींचा प्रभाव, त्याचं आकर्षण स्पष्टपणे का जाणवतं... रेषा, चित्रातला अवकाश यांबाबत बोलताना त्यांनी चित्रकला आणि संगीत यांतलं साम्य सांगितलं तेव्हा कलाकार म्हणून आपल्या आवडत्या कलेइतकाच अभ्यास इतर कलांचाही असणं आणि त्यांचा आस्वाद घेणं किती महत्त्वाचं आहे हे प्रकर्षानं जाणवलं.

चित्रं किंवा शिल्पं यांत मोकळं अवकाश असायला हवं म्हणजे आस्वादकाला त्याच्यात सहज सहभागी होता येतं आणि ते अवकाश तो त्याच्या परीनं भरतो. एक कलाकार म्हणून कलाकृती साकारताना प्रेक्षकाशी असणाऱ्या तिच्या भावबंधांचा विचार कसा आणि कुठपर्यंत करता यायला हवा हे कधीच कुठल्याच कलाशाखेत सांगितलं जात नाही... शिकवलं जात नाही... जे या संवादातून सहज उलगडलं.



विचारांची सुस्पष्टता किती असावी याचं उत्तम उदाहरण म्हणजे ‘मी चित्रकारच होणार आणि मला फक्त उत्तम चित्रंच काढता येतात तेव्हा मी त्यातच काम करणार...’ हे त्यांनी अगदी शालेय वयातच ठरवलं होतं आणि त्यानुसारच त्यांनी त्यात उत्तम कारकिर्द घडवलीही.

चंद्रमोहन कुलकर्णी उत्तम लेखकही आहेत. 'बिटवीन द लाईन्स' हे त्यांच्या कारकिर्दीचा लेखाजोखा मांडणारं त्यांचं पुस्तक नुकतंच आलं आहे.

आपल्या कलेची, कलाक्षेत्राची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणं इतकाच या लेखनामागचा उद्देश नसून आपल्या निर्मितीची कारणं शोधणं, चित्रातून व्यक्त होऊनही जे उरलं आहे ते शब्दांतून व्यक्त करणं हा त्यांच्या लेखनाचा मूळ  हेतू आहे. असा प्रयत्न प्रत्येकानं करायला हवा.

अलीकडे इकिगाई हा प्रकार तरुणांत खूपच लोकप्रिय झाला आहे. मला वाटतं चंद्रमोहन सरांनी अगदी लहानपणीच आपला इकिगाई ओळखला होता आणि फक्त त्यासाठीच ते काम करत राहिले. जगरहाटीला शक्यतो मान्य न होणारा आपला 'आतला आवाज' दडपून न टाकता तो ठामपणे मांडणारा आणि त्यात यशस्वी होणारा हा कलाकार मला फारच भावला कारण मीही याच कलाक्षेत्रात कार्यरत आहे.

हा संवाद पुन्हापुन्हा ऐकून, समजून घेऊन त्याची अनुभूती समृद्ध करणारा आहे... तुम्हालासुद्धा तो आवडेल याची मला खात्री आहे.

'पुस्तकांना चेहरा देणारा माणूस' हा कार्यक्रम पाहण्यासाठी...

Play Audio

Watch Video




**Rotary Club Of Pune South** | Rotary | SERVE TO CHANGE LIVES



Shri Shrinivasrao Sohoni
IAS (Retd),
Former Advisor to
President of Afghanistan



Chief Guest
Hon Shri Prataprao Pawar



Guest of Honour
PDG Rtn Arunji Kudale

# Vocational Excellence Award

2nd January 2022 | 11:00AM to 1:00PM
Venue: IMA Hall, Tilak Road Pune

**President: Rtn. Atul Atre**

**Secretary: Rtn. Krishnakiran Velankar**

**Rotary Club Of Pune South** | Rotary | SERVE TO CHANGE LIVES



# “अरविंदाचं वेगळंच काही”

**रो. अरविंद माने यांचा काव्य, गझल, गाणी, नकलांचा कार्यक्रम.**

**१० जानेवारी २०२२ | सा. ७.३० वा**

**Program Committee: Rtn. Mridula Ghodke**
**President: Rtn. Atul Atre**
**Secretary: Rtn. Krishnakiran Velankar**

## Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES



# "तिळगुळ"

क्लबच्या ॲन्स, ॲनेट्स आणि सदस्यांचा कार्यक्रम.

१७ जानेवारी २०२२ | सा. ७.३० वा

संयोजक-
प्रे. रो. अतुल अत्रे
फर्स्ट लेडी ॲन नंदिनी अत्रे



## Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES





प्रजासत्तादिनाचा सोहोळा आणि १९७१ मध्ये बांगलादेश युद्धाच्या विजय दिनाच्या सुवर्णजयंती निमित्त या युद्धात शहीद झालेल्या वैमानिकाच्या वीरपत्नी अनुराधा ढवळे यांच्याशी बातचीत.

२४ जानेवारी २०२२ | सा. ७.३० वा

Program Committee: Rtn. Mridula Ghodke
President: Rtn. Atul Atre
Secretary: Rtn. Krishnakiran Velankar



## Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES





# "मुलाखतीतून माणसं जोडताना"

## - आरती पटवर्धन

आकाशवाणी निवेदिका, दूरदर्शन मुलाखतकार
आरती पटवर्धन यांचा दृक- श्राव्य माध्यमाचा प्रवास.

३१ जानेवारी २०२२ | सा. ७.३० वा


Program Committee: Rtn. Mridula Ghodke
President: Rtn. Atul Atre
Secretary: Rtn. Krishnakiran Velankar




## सोया मिल्क वर्कशॉप क्रमांक ८
## १७ डिसेंबर २०२१

१७ डिसेंबर रोजी आपण आपले सोया मिल्क वर्कशॉप आंबवणे जवळील आडवले या गावी घेतले. बचत गटाच्या सुमारे १५ महिला तेव्हा उपस्थित होत्या. कार्यशाळा अतिशय उत्तम झाली. सोयाबीन पासून दुध, दही,पनीर करण्याचे प्रशिक्षण त्यांना आपल्या गोरे सर यांनी दिले. कार्यक्रमानंतर आपण यांना मिक्सर व प्रेस विनामूल्य दिले.

कार्यक्रमाचे आयोजन रवींद्र प्रभुणे यांनी केले होते. आपल्याकडून रो. मिलिंद क्षीरसागर व त्यांचे मित्र श्री पुरंदरे स्वतः जातीने उपस्थित होते. श्री.पुरंदरे यांची वेल्हा येथे जमीन असून तिथल्या आजूबाजूच्या बचत गटांमध्ये आपण हा कार्यक्रम राबवू असा मनोदय त्यांनी व्यक्त केला.







## सोया मिल्क वर्कशॉप क्रमांक ९
## २० डिसेंबर २०२१

२० डिसेंबर रोजी आपली सोया दूध कार्यशाळा आस्कवाडी वेल्हा येथे पार पडली. गोरे सरांनी तिथल्या बचत गटातल्या महिलांना प्रशिक्षण दिले. सोया पासून दूध दही व पनीर कसे करायचे त्याचे प्रात्यक्षिक आज झाले. कार्यशाळेनंतर आपण त्यांना मिक्सर व प्रेस विना मूल्य दिला. कार्यक्रमाचे आयोजन रो. रविंद्रजी प्रभुणे यांनी केले.

रो. दत्ताजी देवधर आणि श्री. मोहन दड्डीकर (आपल्या क्लबच्या प्रकल्पात मदत करणारे अथश्रीवासी) पूर्ण वेळ सहभागी होते

पी. पी. रो. गोरे सर व रो. रविंद्रजी प्रभुणे यांच्या प्रयत्नांमुळे या आपल्या प्रकल्पाला आता उत्तम गती प्राप्त झाली आहे.त्यांना मनःपूर्वक धन्यवाद !





## सोया मिल्क वर्कशॉप क्रमांक १०
## २१ डिसेंबर २०२१

२१ डिसेंबर रोजी आपली सोया दूध कार्यशाळा मेरावणे वेल्हा येथे पार पडली. गोरे सरांनी तिथल्या बचत गटातल्या महिलांना प्रशिक्षण दिले. सोया पासून दूध दही व पनीर कसे करायचे त्याचे प्रात्यक्षिक आज झाले. कार्यशाळेनंतर आपण त्यांना मिक्सर व प्रेस विना मूल्य दिला. कार्यक्रमाचे आयोजन रो. रविंद्रजी प्रभुणे यांनी केले.

या कार्यशाळेत करता आपले रो विनायक देशपांडे, रो नितीन पाठक व श्री पाटील हे उपस्थित होते.





# अंतर रोटरी एकांकिका स्पर्धा
# १३ डिसेंबर २०२१

अंतर रोटरी एकांकिका स्पर्धेमध्ये आपल्या क्लबची “सांत्वन” ही एकांकिका १३ डिसेंबर रोजी भरत नाट्य मंदिर येथे सादर झाली.

एकांकिका खूपच सुंदर झाली. सर्व कलाकार ॲन रिया अंबिके, ॲन गौरी क्षीरसागर व रो.अभिजित देशपांडे यांनी घेतलेली मेहनत स्पष्ट दिसत होती. तिघांनीही काम सुरेख व समरसून केले. आशुतोष व प्रिया नेरलेकर यांनी दिग्दर्शन उत्तम केले. पडद्याच्या मागील कामात  रो. आनंद कुलकर्णी, रो. योगेश नांदुरकर, सुभाष करंदीकर, ॲन माधवी देशपांडे व रो. किरण वेलणकर यांनी बरीच धावपळ केली. नाटकाचे व्हिडिओ चित्रीकरण हे रो. संदीप अवधानी याने केले.

या एकांकिके करीता आपल्या क्लबच्या सभासदांची उपस्थिती उत्तम होती. सुमारे ३५ सदस्य जातीने उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर कलाकारांचे आगमन झाल्यावर सर्व सदस्यांनी जोरदार जल्लोष केला. पडद्या पुढील, पडद्यामागील सर्व कलाकारांचे तसेच त्यांना प्रोत्साहन द्यायला आलेल्या सर्व सदस्यांचे मनःपूर्वक धन्यवाद !

"सांत्वन" या नाटकाचे रेकॉर्डिंग आपण या लिंकवर पाहू शकता:

Watch Video



# रोटरी युवा क्रिकेट स्पर्धा
# १८ डिसेंबर २०२१

१८ व १९ डिसेंबर रोजी रोटरी क्लब ऑफ पुणे युवा यांच्या तर्फे रोटरी युवा क्रिकेट स्पर्धा कमिन्स कॉलेज मागे डर्बी येथे आयोजित केली होती.

आपल्या क्लब तर्फे रो. ऋषिकेश बडवे, रो. निरंजन ठाणगावकर, रो. मिलिंद व ॲन गौरी क्षीरसागर, रो. रश्मी परुळकर, रो. जितेंद्र महाजन, रोट्रॅक्टर आकाश व स्वतः प्रे. अतुल अत्रे यांनी भाग घेतला होता.

सकाळपासून आपल्या चार मॅचेस झाल्या.त्यातल्या पहिल्या दोन मॅचेस मध्ये आपल्याला निसटता पराभव पत्करावा लागला. मग सर्वजण पेटून उठले आणि उरलेल्या दोन्ही मॅचेस आपण जबरदस्त झुंजीने जिंकल्या. सेमी फायनलला आपली एंट्री निश्चित होती परंतु अत्यंत थोड्याशा फरकामुळे आपण सेमी फायनल ला जाण्याकरता पात्र झालो नाही. परंतु सकाळपासून संध्याकाळी ७ पर्यंत सर्वजण अक्षरश: उत्साहाने भारून मॅचेस खेळत होते. रश्मीचा मुलगा शर्व हा सुद्धा दिवसभर उपस्थित होता व त्याने खूप मदत केली. रोट्रॅक्टर आकाशने मैदानावर तर कमाल केलीच पण आपल्या वागणुकीमुळे सगळ्यांची मनं त्याने जिंकून घेतली.

या स्पर्धेकरता ऋषिकेश बडवे याने खूप परिश्रम घेतले. स्पर्धेच्या आधी दोन दिवस त्याने डर्बी बुक करून सगळ्यांकडून प्रॅक्टिस करून घेतली. आपल्या संघाचे नेतृत्व सुद्धा त्यानेच केले.

या स्पर्धेत रो. रश्मी परुळकर हिने सुरुवातीलाच २ विकेट्स घेतल्या व दमदार सुरुवात केली.

रो. रश्मी परुळकर व ॲन गौरी क्षीरसागर यांना वूमन ऑफ द मॅच पुरस्कार मिळाला. दोघींचे अभिनंदन !!






# लिटरेचर सॅटेलाईट क्लब-पुस्तकाश्रम
## २० डिसेंबर २०२१

२० डिसेंबर २०२१ रोजी कर्वेनगर इथल्या जी आर पालकर प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय - या शाळेच्या ग्रंथालयाला लिटरेचर सॅटेलाईट क्लबतर्फे  'पुस्तकाश्रम' योजनेअंतर्गत मुलांसाठी आणि शिक्षकांसाठी काही पुस्तकं दिली.

'पुस्तकाश्रम' योजनेअंतर्गत झालेल्या पहिल्याच पुस्तकदानाबद्दल तुम्ही जे कौतुक करताय... ते ऊर्जादायी आणि उत्साह वाढवणारं आहे.

तुमच्यातल्या काही दात्यांनी दिलेल्या पुस्तकांच्या रूपानं खाद्य पुरवल्यामुळं प्रकल्प बाळसं धरतोय.

तुमच्या माहितीतल्या एखाद्या ग्रंथालयाला आपण पुस्तकं देऊ या... असं जर तुम्हाला वाटत असेल तर मला किंवा रो. प्राजक्ता कोळपकर यांना नक्की कळवा.

पुन्हा एकदा सगळ्यांना धन्यवाद! 



## लिटरेचर सॅटेलाईट क्लब-पुस्तकाश्रम
## २४ डिसेंबर २०२१

२४ डिसेंबर २०२१ रोजी  लॉ कॉलेज रस्त्यावर असलेल्या रामचंद्र राठी विद्यालय - या शाळेच्या ग्रंथालयाला लिटरेचर सॅटेलाईट क्लबतर्फे  'पुस्तकाश्रम' योजनेअंतर्गत मुलांसाठी आणि शिक्षकांसाठी काही पुस्तकं दिली.

या वेळी मेट्रो रोटरी क्लबचे पीपी रो. मुकुंद चिपळूणकर आणि पीपी रो. मिलिंद घैसास हजर होते.

शाळेच्या मुख्याध्यापिका मधुरा मोने आणि ग्रंथपाल सुजाता पेंढारकर यांच्याकडे पुस्तकं सुपुर्त करण्यात आली.





## e-Waste Collection Drive-RSCP South Gold
## 19 Dec 2021

On 19th Dec Rotary Satellite Club Of Pune South Gold conducted its monthly E-Waste Collection Drive at Belvedere Society, Aundh. This is the 3rd drive conducted by the club.

This drive coincided with the Mega E-Waste Collection Drive organised by Team Environment RID 3131 in association with FICCI and Swach. Many collection points for the e-waste were set up all over Pune and PCMC area.

e-Waste collected during the drive was around 40 kg.

The e-waste collected in the drive was  handed the collection center at Friends Electronics, Aundh (Associated with RCP Baner)

Rtn. Shilpa Pande, Rtn. Bahar Tepan, Rtn. Bhagyashree Ogale, Rtn. Sapna Dabholkar, Rtn. Sonali Belhekar, Rtn. Gaurav Agarwal, Rtn. Neha Deshpande, Rtn. Akshay Kirpekar, Club Secretary Rtn. Aditi Kirpekar and Club Chair Rtn. Onkar Joshi were present.

Thanks to all dignitaries of society for participating in the noble cause.

Don't throw E-Waste in #garbage.

#Save #Environment by recycling it properly.

ReUse, ReCycle, Reduce and Refuse.












# द रोटरी फाऊंडेशन- पी.डी.जी. रो. मोहन पालेशा

२९ नोव्हेंबर २०२१

**पीपी रो. संदीप विळेकर**

ही साप्ताहिक सभा खास रोटरी फाउंडेशन महिन्यानिमित्त आयोजित केली होती. प्रमुख पाहुणे होते पी.डी.जी. रो. मोहन पालेशा. सभेची सुरुवात औपचारिक उदघोषणांनी झाली. या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे नोव्हेंबर या फाउंडेशन महिन्यात आपल्या क्लब मधील १६ सदस्यांनी रोटरी फाउंडेशनला भरघोस योगदान देऊन क्लबची प्रतिष्ठा उंचावण्यास मदत केली.

पीपी रो. शाम कुलकर्णी यांनी पी.डी.जी. रो. मोहन पालेशा यांची ओळख करून दिली. त्यानंतर पी.डी.जी. रो. मोहन पालेशा यांनी त्यांच्या खुमासदार व शेरोशायरी युक्त भाषणातून रोटरी फाउंडेशन ही संकल्पना उलगडून दाखवली. उपस्थित सर्व सभासदांना सहभागी करून एका छोट्या प्रश्नमंजुषा द्वारा त्यांनी रोटरी फाउंडेशनच्या विविध पैलूंविषयी मार्गदर्शन केले. उपस्थित सर्वजण उत्साहाने सहभागी झाले होते. रोटरी फाउंडेशनसाठी आपले आर्थिक योगदान दिल्यावर क्लबच्या प्रोजेक्टसाठी रोटरी फाउंडेशनकडून आपल्या योगदानाच्या कितीतरी पट रक्कम क्लबकडे परत कशी येऊ शकते याची सुद्धा त्यांनी कल्पना दिली त्याच बरोबर रोटरी फाउंडेशनच्या सात फोकस एरियाची त्यांनी ओळख करून दिली. आपण रोटरी फाउंडेशनला कशाप्रकारे योगदान देऊ शकतो याची तर पी.डी.जी. रो. मोहन यांनी कल्पना दिलीच पण हे योगदान का करायचे याचे अनेक उदाहरणे देऊन उत्तम विश्लेषण केले. शेवटी रोटरी फाउंडेशनला केलेले योगदान हे सर्वांना कशाप्रकारे एक प्रकारचे भावनिक समाधान (इमोशनल फुलफिलमेंट) देते हे सांगून त्यांनी आपले भाषण संपवले.

पीपी रो. संदीप विळेकर यांनी आभार मानले व आजची सभा संपूर्ण झाली.



# ज्योतिषशास्त्र आणि रुढींमागचे विज्ञान

०६ डिसेंबर २०२१

अॅन यामिनी पोंक्षे

तसे तर आपल्या रोटरी मध्ये अनेकविध कार्यक्रम होत असतात. असाच एक खूप चांगला विषय ०६/१२/२०२१ रोजी झालेल्या weekly meeting मधील कार्यक्रमात मांडला गेला.

विषय होता "ज्योतिषशास्त्र आणि रुढींमागचे विज्ञान" या विषयावर मार्गदर्शन करायला आपल्याला सौ. उर्मिला शेजवलकर यांसारख्या वक्त्या लाभल्या होत्या.

सौ ऊर्मिला सुनील शेजवलकर यांनी पुणे विद्यापीठातून १९८१ सालीM.A. Philosophy केले आहे. तसेच पहिल्यापासून ज्योतिष विषयातली आवड असल्याने त्यांनी नंतर भालचंद्र ज्योतिष विद्यालय येथुन हस्तसामुद्रीक विषारद, अंकज्योतिष विशारद, ज्योतिष विषारद या पदव्या संपादन केल्या. आणि नंतर महाराष्ट्र ज्योतिष परीषद येथुन ज्योतिष शास्त्री ही पदवी देखील प्राप्त केली.

पाहुण्यांची ओळख अँन यामिनी पोंक्षे यांनी करून दिली. तसेच मुलाखतीच्या स्वरूपात झालेल्या या कार्यक्रमाची सूत्रे अॅन नंदिनी जोग यांनी अतिशय छान हाताळली. अतिशय मार्मिक प्रश्न आणि खूप विविधांगी विषय अतिशय सहज हाताळत आणि मुलाखत ही सर्वसमावेशक करून घेत मुलाखतीच्या शेवटी सर्व सभासदांना प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपापल्या शंका निरसन करून घेण्याची संधी दिली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला उर्मिलाताईंनी ग्रह म्हणजे काय? राशी म्हणजे काय? तसेच कुंडलीतील १२स्थाने व त्यांची माहिती याबद्दल दिली. ज्योतिष शास्त्र हे प्राचीन शास्त्र असून आपली कुंडली ही आपल्या आयुष्याचा आरसा असते. आयुष्यातील महत्वाच्या घटनांचा या पत्रिकेच्या माध्यमातून अंदाज घेऊन आपल्या मनाची तयारी करता येते. तसेच लग्नाच्या दृष्टीने पत्रिकेवरून वैवाहिक सुखाचा अंदाज घेता येतो. तसेच शिक्षण आणि करिअर या दृष्टीने सुद्धा एक मार्गदर्शक शास्त्र म्हणून ज्योतिषशास्त्र नक्कीच विचारात घेता येईल. तसेच जन्मवेळेनुसार जन्म हा पूर्ण दिवस भरून झाला आहे की premature आहे हे देखील समजते. यासारखेच जन्मवेळेच्या ९महिने, ९दिवस आणि ९तास मागची कुंडली मांडून त्यावरून देखील आयुष्यातील घडामोडींचा अचूक अंदाज मांडता येतो. त्या कुंडलीला अधान कुंडली असे म्हणतात.

कुंडली प्रमाणेच हस्त सामुद्रिक, टॅरो कार्ड तसेच अंकशास्त्र, वास्तूशास्त्र असे अनेक मार्ग आहेत भविष्यातील घडामोडींचा अंदाज घेण्याचे. थोडक्यात काय तर डेस्टिनेशन एक आणि तिथे पोहोचण्यासाठीची ही वेगवेगळी साधने आहेत. यापद्धतीने उर्मिलाताईंनी मार्गदर्शन केले.

याच बरोबर दारात रांगोळी का काढतात, देवासमोर संध्याकाळी दिवा का लावावा या मागील शास्त्रीय दृष्टिकोनही छान समजावून सांगितला. शेवटी झालेल्या प्रश्नोत्तरांना देखील छान समर्पक उत्तरे देऊन प्रत्येकाच्या शंका निरसन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

अशाप्रकारे रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ च्या २०२१-२२च्या वर्षातील अनेक उत्तम कार्यक्रमातील एक उत्तम कार्यक्रम ६ तारखेला झाला आणि आम्हा सर्वांना त्यामध्ये सहभागी होता आले याचे समाधान आम्हाला आहे. धन्यवाद.





# तमसो माऽ ज्योतिर्गमय

१३ डिसेंबर २०२१

ॲन ऋचा नांदुरकर

१३ डिसेंबरची सभा ही ख्रिसमस विशेष सभा होती. ज्येष्ठ सभासद दादासाहेब बेंद्रे आणि जयश्रीताई बेंद्रे तसंच अनिल लोखंडे आणि शुभदा लोखंडे यांचा पुणे साऊथ मधील त्यांच्या आजीवन योगदाना करीता विशेष सन्मान करण्यात आला. केक कापून हा क्षण साजरा केला गेला. क्लबमधल्या त्यांच्या योगदानाचा लेखाजोखा मांडणारं मनोगत पीडीजी रो. अरुण कुदळे यांनी व्यक्त केलं.

'क्लबच्या कामाबरोबरच माझ्या व्यक्तिगत आयुष्यातसुद्धा या दोघांचं मार्गदर्शन मला लाभलं...' असं आयपीपी रो. सुदर्शन नातू यांनी त्यांच्या मनोगतात सांगितलं.

एका डोळ्यात आसू आणि एका डोळ्यात हासू... याची अनुभूती देणारा हा क्षण....

डिसेंबर महिना म्हणजे कुडकुडणारी थंडी, मस्त गरमगरम कॉफी, कपाटाच्या मागच्या भागातून पुढे आलेले ठेवणीतले उबदार कपडे असं काहीसं चित्र नजरेसमोर येतं... पण याचबरोबर आठवतं... ते म्हणजे जगभर साजरा केला जाणारा सण ख्रिसमस. ख्रिसमस म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर लाल ड्रेस, पांढरी दाढीमिशा असलेला सांताक्लॉज, ख्रिसमस ट्री अणि येशू ख्रिस्ताचा जन्म या सगळ्या गोष्टी येतात.

येशू ख्रिस्ताच्या जन्माची कहाणी, उत्सव आणि मराठी बांधवांनी आपलीशी केलेली ही मराठमोळी ख्रिश्चॅनिटी म्हणजेच 'तमसो माऽ ज्योतिर्गमय' हा कार्यक्रम. तो सादर केला डॉ. अमित त्रिभुवन यांनी.

अनेक जाहिरातींना अमितजींचा सुरेल आवाज लाभला आहे. कवी जयंत त्रिभुवन यांचा मुलगा अमित त्रिभुवन अशी त्यांची ओळख रोटरिअन मृदुला घोडके यांनी करून दिली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. अमित यांनी एका सुंदर कवितेनी केली. त्यानंतर मुख्य गायिका आरजे स्मिता (स्मिता त्रिभुवन) यांनी आपल्या सुरेल आवाजात विश्वकल्याणाकरता प्रार्थना गायली. साऱ्या जगात सत्य, प्रेम, शांती पसरावी अशी आशा व्यक्त करणारी ही प्रार्थना.

प्रार्थनेनंतर गायलेलं गीत... 'तेजोमय तू अविनाशी' - सूर्यप्रकाश कितीही प्रखर असला तरीही कधीतरी तोसुद्धा काळ्या ढगांनी झाकला जातो... असंच काहीसं आपलं जीवनही असतं असं हे गाणं सांगून जातं.

२५ डिसेंबर हा जरी आपण येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणून साजरा करत असलो तरी कालचक्रानी मागे गेलो तर असं आढळतं की, येशू ख्रिस्ताचा जन्म वसंत ऋतूत म्हणजे मार्च महिन्यात  झाला असावा. त्या काळातल्या रोमन राजानी सूर्याचा उत्सव साजरा करायला सुरुवात केली. नंतर तो ख्रिसमस या स्वरूपात साजरा व्हायला लागला असं डॉ. अमित त्रिभुवन यांनी सांगितलं.

येशूच्या जन्मसोहळ्याचं वर्णन करणारं 'ये जन्मा येशू राणा' हे गाणं... लोकांच्या उद्धारासाठी येशूचा जन्म झाला आणि सगळीकडे आनंद पसरला... याची आठवण करून देणारं....

डॉ. अमित यांनी देवाशी बोलणारा माणूस नेक होता अशा आशयाची सुंदर कविता ऐकवली.

त्यानंतर आरजे स्मिता (स्मिता त्रिभुवन) आणि सनातन वाडकर यांनी 'आनंद मज होई आजला... ख्रिस्त जन्मला' - हे युगुलगीत सादर केलं.

कार्यक्रमात ख्रिस्ती प्रार्थनेची किंवा उपासनागीतांची मेडलीसुद्धा  सादर करण्यात आली.

कलाकारांनी इंग्लीश कॅरोल्सचीपण झलक ऐकवली आणि सगळ्यांच्या आवडीचं 'जिंगल बेल' मराठीतून सादर होत असतानाच दोन छोटे सांताक्लॉज आले. त्यांनी चॉकलेट्स वाटली आणि सगळ्यांना ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या.

या सगळ्या कार्यक्रमाला तबल्याची उत्तम साथ होती शॅरन निकाळजे यांची, सिंथेसायझरवर निशांत डोंगरे, तर गिटारवर विनय सोलोमन होते. सनातन वाडेकर यांनी गाण्याबरोबरच हार्मोनिअमवादन अशी दुहेरी जबाबदारी पार पाडली.

रो. श्वेता करंदीकर यांनी सर्वांचे आभार मानले.










# यमक वगैरे

## २० डिसेंबर २०२१

## रो. उल्का पासलकर

२० डिसेंबर रोजी झालेल्या साप्ताहिक सभेत सुरुवातीला या वर्षी एकांकिका स्पर्धेत भाग घेऊन “सांत्वन” नाटकात सहभागी झालेल्या सदस्यांचा सन्मान करण्यात आला. ॲन गौरी क्षीरसागर यांना उत्तम अभिनयाचं आणि ॲन माधवी देशपांडे यांना उत्तम पार्श्वसंगीताचं बक्षीस मिळाल्याबद्दल सगळ्यांनी त्यांचं आणि “सांत्वन” टीमचं कौतुक केलं. ॲन प्रियदर्शिनी अंबिके आणि रो. अभिजित देशपांडे यांनी आपापली मनोगतं व्यक्त केली.

त्यानंतर दीपावली फोटोग्राफी स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षिसं दिली गेली. त्यात प्रथम क्रमांकाचं बक्षीस ॲनेट आदित्य अभिजित देशपांडे याला, द्वितीय क्रमांकाचं बक्षीस ॲनेट युवराज दत्तात्रय पाषाणकर याला तसंच तृतीय क्रमांकाचं बक्षीस ॲननेट सिद्धराज योगेश नांदुरकर आणि ॲनेट यश राघवेंद्र पोंक्षे यांना विभागून देण्यात आलं.

या नंतर झालेल्या 'यमक वगैरे...'नी चार चाँद   लावले.

ये शाम के रंगीन सायें...

यमक वगैरे...!

संधिकाली अनुभवायला मिळणारी रविराजाच्या किरणांची सोनपिवळी कोवळीक ज्याच्या शब्दांमधून वाहते... तो आदित्य

सूर आणि शब्द जिचं बोट धरून पदन्यास करतात... ती श्रुती

'महफिल हमारी है... लूट आप लीजिये...'मधून मैफिलीचा अलवार तरल अहसास जागवणारा आश्वासक स्वर... निरंजन

शब्दांचं मोरपीस कानामनावर फिरवण्याची नजाकत मिरवणारी कवितासखी... मयुरी

तबल्यावरून अलगद फिरत अंगुलीनृत्य करणारा, शब्दांत न मोजता येणारा सूर... अमित

कृष्णसखी मुरलीशी सलगी करत, तिच्याशी हितगूज करू पाहणारा... प्रीतम

सात सुरांबरोबरच अकार, उकार आणि मकार यांच्याशी तादात्म्य पावलेला गिटारचा झंकार... ओम

आज हाथ थाम लो, इक हाथ की कमी खली असेल... दिल चीज क्या है असेल... नाहीतर केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली असेल... गाणं आणि काव्य यांच्या फ्युजनची हटके झलक... तीही शब्दस्वरांच्या मिलनाचा सोहळा साजरा करणारी...!

उन्हाला गिळून, वाऱ्याला लेवून, ऋतूबितूंचे शिष्टाचार तोडून अचानक आलेला मयुरीचा अद्भुत पाऊस...

तू चिरतरुण आयुष्य, मी लवकर आलेली साठी

किंवा...

मी मातीतलं रताळं, तू उंच झुलणारा वेल

अशा कित्येक 'तू तू मैं  मैं 'ची सांगता... आदित्यच्या शब्दस्वरांचा साज ल्यायलेली... 'तिच्या' होकाराची प्रश्नांकित अपेक्षा....

मान क्यो नहीं लेता कि जिंदगी में सबकुछ सही होना जरुरी तो नहीं

जहाँ खोयी थी वो मुस्कान उसी जगह मिले ऐसा भी तो नहीं |

लॉकडाऊनमधली अगतिकता व्यक्त होतानाच मनाला धीर देऊ पाहणाऱ्या निरंजन ओळी...

बडे अच्छे लगते है... लग जा गले... शारद सुंदर चंदेरी राती... अशा कितीतरी सुमधुर गाण्यांच्या आठवणी जागवणारी श्रुतीची स्मृती....

शब्द, सूर आणि ताल यांची लय पकडण्याचा तरुणाईनं केलेला प्रयत्न... मराठी कविता-गाणी, चारोळ्या, हिंदी गझल-शायरी यांची मनाला भुरळ घालणारी गुंफण... काव्याच्या आणि संगीताच्या प्रेमात पाडणारा आविष्कार... यमक वगैरे...!

प्रीतमच्या पाव्यातून उमटलेल्या 'ये मोह मोह के धागे'चे सूर... मुरलीशी सलगी साधताना होणारी त्याच्या बोटांची नाजूक हलचल... 'तेरी उंगलियों से जा उलझे'मधली कशिश ठळक करणारी... 'किस तरह बिरहा ये सुलझे?'मधली घालमेल केवळ सुरांमधून ओथंबून वाहतानाची अनुभूती शब्दांच्या पलीकडला अवकाश कवेत घेऊ पाहणारी. 'है रोम रोम इकतारा जो बादलों में से गुज़रे...'मधल्या असोशीच्या नादाला गिटारची आणि तबल्याची मंदधुंद साथ...!

या मैफिलीनी एकमेव भाव वातावरणात आणि मनामनांत भरून राहिला...

इक हसीं शाम को दिल मेरा खो गया....

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रो. पल्लवी गोरे यांनी कलाकारांची ओळख करून दिली. साउंड आर्टिस्ट शैलेश घावटे यांनी कलाकारांचा आवाज प्रेक्षकांपर्यंत पोहोचवला. झूमच्या माध्यमातून फेसबुक लाइव्हद्वारे कार्यक्रमाच्या ऑनलाईन प्रक्षेपणाची तांत्रिक बाजू रो. हेमंत वाळिंबे यांनी सांभाळली. रो. उल्का पासलकर यांनी आभार प्रदर्शन केले.




Watch Video



# वार्षिक सर्वसाधारण सभा

२७ डिसेंबर २०२१

## रो. अभिजित देशपांडे (AB)

२७ डिसेंबर रोजी आपल्या क्लबची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. क्लबचे ज्येष्ठ सदस्य पी. पी. रो. गोविंदराव पटवर्धन यांना नुकताच राज्यपालांच्या हस्ते  पुरस्कार देण्यात आला. सभेची सुरुवात गोविंदरावांचा सत्कार करून करण्यात आली.

रोटरी फौंडेशनला देणगी देऊन पॉल हॅरिस फेलो झालेल्या  प्रे. इ. रो. संजीव व ॲन स्नेहा ओगले, रो. दत्ता पाषाणकर, रो. योगेश व ॲन ऋचा नांदुरकर, ॲन भाग्यश्री महाजन यांना त्यांच्या PHF पिन्स रो. डॉ. राजेंद्र गोसावी यांच्या हस्ते देण्यात आल्या.

यानंतर प्रे. रो. अतुल अत्रे यांनी जाहीर केले की नॉमिनेशन कमिटीने नामांकन केलेल्या  रो. व. २२-२३ च्या संचालक मंडळातील सदस्यांना दिलेल्या मुदतीत कोणीही आक्षेप नोंदवलेला नाही व त्यामुळे हे संचालक मंडळ अधिकृत झाले आहे. या प्रसंगी या संचालक मंडळातील सदस्य प्रे. इ. रो. संजीव ओगले, रो. अभिजित देशपांडे, रो. योगेश नांदुरकर यांचा सत्कार करण्यात आला.

या नंतर प्रेसिडेंटनी मागील सहा महिन्यातील क्लबच्या वाटचालीचा आढावा घेतला. सर्व कमिटी उत्तम प्रकारे काम करीत असून सोयामिल्कचा प्रोजेक्ट फरक उत्तमरित्या चालू असल्याचे सांगितले. या प्रोजेक्ट करिता पी.पी. रो. डॉ. सुधांशु गोरे व प्रे. नॉ. रो. रवींद्र प्रभुणे यांनी खूप मेहेनत घेतल्याचे आवर्जून सांगितले तसेच आपले दोन्ही सॅटेलाईट क्लब देखील उत्तम प्रकारे काम करत असल्याचे सांगितले.

आपल्या क्लब मधील सदस्यांचे कार्यक्षेत्र अर्थात क्लासिफिकेशन यावर मेम्बरशिप डायरेक्टर रो. योगेश नांदुरकर यांनी एक समिती स्थापन करून त्याचा अभ्यास केला. या समितीचे अध्यक्ष पी.पी. रो. शाम कुलकर्णी व सदस्य पी.पी. रो. गोविंदराव पटवर्धन व पी.पी. रो. संदीप विळेकर यांनी उत्तम प्रकारे काम करून सदस्यांची कार्यक्षेत्रानुरूप यादी तसेच ज्या कार्यक्षेत्रातील सदस्य आपल्याकडे नाहीत त्याची यादी तयार केली आहे. ही यादी संचालक मंडळांसमोर ठेवून त्यांच्या मान्यतेनंतर सर्व सदस्यांना उपलब्ध करून दिली जाईल त्यानुसार आपल्याला नवीन सदस्य सुचवता येतील असे रो. योगेशने सांगितले.

या नंतर प्रेसिडेंटने जाहीर केले की आता मंच खुला असून ज्यांना काही सूचना, हरकती असतील त्या त्यांनी सांगाव्या. या खुल्या मंचात  प्रे. इ. रो. संजीव ओगले, रो. सुभाष चौथाई, रो. दत्ता  पाषाणकर, रो. अभिजित देशपांडे, रो. गोविंदराव पटवर्धन, प्रे. नॉ. रो. रवींद्र प्रभुणे यांनी उपयुक्त सूचना केल्या. या सर्व सूचना संचालक मंडळासमोर मांडण्या येतील असे सांगून  प्रेसिडेंटनी सभा संपल्याचे जाहीर केले.



**Read past issues**        **मागील अंक वाचा**